महार... राज्य सेवा [वैद्यकीय देखभाल]
नियम...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. ... /१०८८/४३४:आरोग्य -९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १५ नोव्हेंबर १९८९

वाचा:- १. महाराष्ट्र राज्य सेवा[वैद्यकीय देखभाल] नियम १९६१ चा नियम ४

२. महाराष्ट्र राज्यसेवा [वैद्यकीय देखभाल] नियम १९६१ चा नियम ८

निर्णय:-

महाराष्ट्र राज्यसेवा [वैद्यकीय देखभाल] नियम १९६१ च्या नियम ४मध्ये पोट नियम ४ नंतर नियम[५] खालील प्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.

"पोटनियम १ च्या खंड [अ] व [ब] अन्वये जो उपचार विनामूल्य मिळण्याचा हक्क शासकीय कर्मचा-यास किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तिला असेल त्या उपचारासाठी त्याने खर्च केलेल्या कोणत्याही रकमेची प्रतिपूर्ती प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिका-याचे जरुर ते प्रमाणपत्र आणि त्याच्या मागणीच्या पुष्ठयर्थ प्रमाणके [ vouchers ]सादर केल्यानंतर त्याला करण्यात येईल. परंतू प्राधिकृत वैद्यकीय प्राधिकाऱ्याला वाजवी वाटेल इतक्याच रकमेची प्रतिपूर्ती देण्यात येईल."

२. त्याचप्रमाणे उपरोक्त नियमांच्या नियम ८ मध्ये पोटनियम ५ नंतर पोटनियम [६] खालील प्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.

पोटनियम [१][२][३][४] अन्वये सर्वात जवळच्या शासकीय रुग्णालयात किंवा अशासकीय रुग्णालयात पाठविलेल्या रुग्णास , प्राधिकृत वैद्यकीय देखभाल अधिका-यांचे त्याबाबतीतील लेखी प्रमाणपत्र प्रस्तुत केल्यानंतर शासकीय किंवा अशासकीय रुग्णालयात जाण्यायेण्याच्या प्रवासाबद्दल प्रवासभात्ता मिळेल.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संमत्तीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.८६४/८९/सेवा-५ दिनांक ३-११-१९८९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

| | |
|---|---|
| Date | 22/12/89 |
| Compilation ... No. | II |
| R. R. No. | 679 |
| INITIAL | |

सही/- [बा. स. फाटक]
सहाय्यक सचिव.

क्र. लेखा-६-आरवली-पशा/८६७
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी, १८/१२/१९८९

प्रति,

१. तहसीलदार सर्व २. उप विभागिय अधिकारी सर्व

३. विशेष भू संपादन अधिकारी सर्व ४. शाखा प्रमुख सर्व

२/- यांजकडे माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

अ. /१८.१२

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता